महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ २८ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १२२ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


# महापालिकांच्या आरक्षण सोडतीचा मार्ग मोकळा

## १५ नोव्हेंबरपर्यंत अंतिम सोडत

**राज्यातील २८ महापालिकांमधील आरक्षणाची सोडत लवकरच निघणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. येत्या आठ ते दहा दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर १५ नोव्हेंबरपर्यंत अंतिम सोडत प्रसिद्ध केली जाईल. यानंतर महापालिका निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. मुंबई वगळता इतर २८ महापालिकांमध्ये चार सदस्यीय प्रभाग रचनेनुसार निवडणुका होणार आहे**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यभरातील महापालिकेच्या निवडणुका जानेवारी महिन्यात होतील असे संकेत आहेत. त्या नियोजनानुसार राज्य निवडणूक आयोग कामाला लागला आहे. राज्यातील सर्व महापालिकेच्या प्रभाग रचना निश्चित झाल्या मात्र आरक्षण सोडत कधी निघणार याची उत्सुकता भावी नगरसेवकांना होती. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकांणी यांनी याबाबत सर्व महापालिकांना पत्र पाठवून आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार राज्यभरातील सर्वच महापालिकांच्या प्रभागांची आरक्षण सोडत 11 नोव्हेंबर रोजी काढली जाणार आहे. एकूण प्रभाग किती याबाबत 4 नोव्हेंबर पर्यंत राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेऊन आरक्षण सोडत काढण्याबाबत आठ नोव्हेंबर रोजी प्रसिद्धीकरण केले जाणार आहे. 11 नोव्हेंबर रोजी आरक्षण सोडत काढून त्याबाबत 17 नोव्हेंबर ते 24 नोव्हेंबर दरम्यान सूचना व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. त्यावर निर्णय होऊन एक डिसेंबर पर्यंत आरक्षण सोडत राजपत्रात प्रसिद्ध केले जाणार आहे. त्यामुळे आता आपापला प्रभाग महिलांसाठी राखीव होतो की इतर प्रवर्गासाठी जातो.. याबाबत अनेक भावी नगरसेवकांनी आपले देव पाण्यात ठेवले आहेत

राज्यातील मुंबई वगळता उर्वरित २८ महापालिकांची निवडणूक ही चार सदस्यीय प्रभाग रचनेनुसार होत आहे. या महापालिकांमध्ये बहुतांश प्रभाग हे चार सदस्यीय असले तरी काही प्रभाग हे तीन आणि पाच सदस्यीय बनले आहेत. महिलांना ५० टक्के आरक्षण असल्याने महिला नगरसेवकांची संख्या ही पुरुष नगरसेवकांपेक्षा अधिक असणार आहे. याशिवाय अनुसूचित जाती आणि जमाती; तसेच इतर मागास प्रवर्गासाठी २७ टक्के आरक्षण देण्याचे निश्चित झाले आहे. या आरक्षणानुसार महापालिकांना सोडत काढावी लागणार असून, त्यासाठीची नियमावली राज्य निवडणूक आयोगाने शुक्रवारी प्रसिद्ध केली आहे. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांनुसार महापालिकांकडून देय आरक्षणांची माहिती आयोगाला पाठविण्यात येणार आहे. आयोगाकडून त्या आरक्षणाला मंजुरी दिल्यानंतर सोडतीचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. पुणे महापालिकेकडून येत्या सोमवारी (२७ ऑक्टोबर) महिला, अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास प्रवर्ग यांचे किती आरक्षण असणार आहे, याचे परिशिष्ट आयोगाला पाठविण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक विभागाचे प्रमुख प्रसाद काटकर यांनी दिली. दरम्यान, आयोगाकडून सोडतीचा कार्यक्रम निश्चित केल्यानंतर त्यानुसार सोडत काढण्यात येणार आहे. राखीव जागांचे वाटप हे चक्रानुक्रमे करण्यात येणार आहे. त्यासाठीची नियमावली प्रसिद्ध झाल्यामुळे आरक्षणाच्या सोडतीची तयारी पूर्ण करण्यात झाली आहे.

## लक्षवेधी

### कांदळवन बचाव अभियानातंर्गत १ हजार टन कचरा संकलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - नवी मुंबई शहराच्या खाडीकिनारी असलेली कांदळवन क्षेत्र हे केवळ हरित सौंदर्य नसून, शहराचे 'ऑक्सिजन झोन' आणि समुद्रकिनाऱ्यांचे नैसर्गिक कवच मानले जातात. समुद्रातील भरती-ओहोटी, वादळे, सुनामीसारख्या परिस्थितीत शहराचे रक्षण करणाऱ्या या कांदणवनाच्या बचावासाठी 'मँग्रोव्हज सोल्जर्स' ही संस्था गेली २७१ आठवडे सलग खाड्यांमध्ये उतरून स्वच्छता मोहीम राबवत आहे. या मोहिमेस ५ वर्ष झाली असून १ लाख स्वयंसेवकांनी १ हजार टन कचरा गोळा केला आहे.

मुंबई महानगर प्रदेशात कांदळवन क्षेत्र मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. या कांदळवनात विविध जैवविविधता आढळून येतात. तसेच याच परसिरात सोनेरी कोल्ह्यांते वास्तव्य असल्याचीही नोंद आहे. या कांदळवन क्षेत्रात कचरा साचत असून त्यामुळे धोका निर्माण होत आहे. याच कांदळवनाच्या बचावासाठी १५ ऑगस्ट २०२० रोजी 'मँग्रोव्हज सोल्जर्स' ही संस्थेने २७१ आठवडे स्वच्छता मोहीम सुरू केली. नवी मुंबईच्या वाशी, नेरूळ, सीबीडी आणि खारघर परिसरातील खाड्यांमध्ये दर रविवारी नियमितपणे ही स्वच्छता मोहिम सुरू आहे. या मोहिमेत आतापर्यंत एक लाखाहून अधिक स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला असून, जवळपास हजार टनांहून अधिक कचरा या खाड्यांमधून बाहेर काढण्यात आला आहे.

### दिव्यात १७ हजारांहून अधिक दुबार मतदार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : विधानसभा निवडणुकीत मतदार याद्यांमधील घोळामुळे वोट चोरी झाल्याचा आरोप केले जात असतानाच, ठाणे महापालिका क्षेत्रातील दिवा परिसरातील मतदार याद्यांमध्ये तब्बल १७,२५८ दुबार नावे आढळल्याचे समोर आली आहे. या संदर्भात, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोन्ही पक्षांच्या स्थानिक नेत्यांनी संयुक्तपणे जिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने यांना निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी केली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्या असताना दिवा शहरात मतदार याद्यांमधील गंभीर अनियमिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शहरातील मतदार याद्यांमध्ये तब्बल १७,२५८ दुबार नावे आढळल्याचे समोर आले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोन्ही पक्षांच्या स्थानिक नेत्यांनी दिवा परिसरातील वार्ड क्रमांक २७ आणि २८ मधील मतदार याद्यांची तपासणी केली. या प्राथमिक तपासणीत एकूण १७,२५८ इतकी दुबार नावे आढळली आहेत. यात एकाच मतदाराचे नाव दोन ठिकाणी नोंदवलेले, तसेच काही ठिकाणी वेगवेगळ्या पत्त्यांवर तीच नावे पुन्हा असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब निवडणुकीची पारदर्शकता धोक्यात आणणारी असून मतदार यादीतील विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे, असा गंभीर आरोप दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून सर्व दुबार नावे तात्काळ मतदार याद्यांमधून वगळावीत, तसेच सुधारित यादी सार्वजनिकपणे उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ठाकरे सेना आणि मनसेच्या नेत्यांनी केली आहे.

### केडीएमसीचा नौकाविहार रात्री ११ वाजेपर्यंत सुरू राहणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - कल्याण शहराच्या मध्यवर्ति ठिकाणी नागरिकांना मनोरंजनासाठी एक साधन असावे या विचारातून कल्याण डोंबिवली पालिकेच्या उद्यान विभागाने प्रबोधनकार ठाकरे सरोवरातील (शेनाळे तलाव) जलतरण विषयक नौकाविहाराची साधने अद्ययावत, सुस्थितीत करून नागरिकांसाठी खुली केली आहेत. सकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत नागरिकांना या नौकाविहार साधनांचा लाभ घेता येणार आहे, अशी माहिती कल्याण डोंबिवली पालिकेच्या उद्यान विभागाचे मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव यांनी दिली. दिवाळी सणातील सुट्ट्या, विविध ठिकाणचे पाहुणे कल्याणमध्ये आपल्या नातेवाईकांच्या घरी आलेले. सुट्टीच्या काळात शाळकरी मुले कुटुंबीयांसह अधिक संख्येने मौजमजेसाठी घराबाहेर पडतात. कल्याणमध्ये आतापर्यंत नागरिकांना दुर्गाडी किल्ल्या जवळील गणेशघाट, गौरीपाडा भागातील सीटीपार्क हेच मनोरंजनाचे ठिकाण होते. अनेक नागरिक कल्याण पूर्वेतील ड प्रभाग कार्यालयाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक याठिकाणी भ्रमंतीसाठी येतात. कल्याण, डोंबिवली शहरात नागरिकांना विरंगुळ्यासाठी काही मोजकीच ठिकाणे आहेत. यामध्ये प्रबोधनकार ठाकरे (शेनाळे) सरोवर हे महत्वपूर्ण आहे.

## बदलापूर-चामटोलीत ट्रस्टच्या माध्यमातून जलसंधारण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : गेल्या सहा महिन्यांपासून पडणाऱ्या पावसामुळे फक्त शेतकरीच हतबल झालेले नसून सर्वसामान्य नागरिकांनाही त्याचा फटका बसला आहे. ही आपत्ती समजून तिला संधीत रूपांतरित करण्याची संकल्पना उराशी ठेऊन याच पावसातून जलसंधारणाचे कार्य बदलापूर जवळ यशस्वीरित्या करण्यात आले आहे. बदलापूर जवळील चामटोली येथे सहा हजार खड्डयांमध्ये तब्बल अडीच कोटी लिटर पाणी साठवण्यात आले आहे. जांभूळ परिसंवर्धन आणि समुदाय विकास ट्रस्टच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविण्यात आला. यंदा ऐन उन्हाळ्यात मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाली. सुरुवातील पश्चिम विक्षोभ, नंतर पूर्व मोसमी आणि मोसमी पावसाने पाच महिने गाजवले. सप्टेंबर महिन्यात पाऊस थांबेल आहे वाटत असताना ऑक्टोबर महिन्यातही पाऊस कोसळलाच. उत्तर मोसमी पावसाच्या सरी बरसल्याने ऐन दिवाळीत पाऊस पडत होता. यामुळे अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली. शहरातही त्यामुळे अनेक समस्या उद्भवल्या. मात्र बदलापूरजवळ चामटोली येथे जांभूळ परिसंवर्धन आणि समुदाय विकास ट्रस्टच्या माध्यमातून यशस्वी जलसंधारण केले आहे. ट्रस्टने चामटोली परिसरात सुमारे सहा हजार खड्डे अर्थात समांतर चर खणले. त्यात पावसाळ्यात तब्बल अडीच कोटी लिटर पाणी साठवण्यात यश आले आहे.

## वेतन श्रेणी प्रशिक्षणासाठी अनुपस्थित शिक्षकांना दिलासा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : वरिष्ठ आणि निवड वेतन श्रेणीच्या ऑनलाइन प्रशिक्षणावेळी झालेल्या तांत्रिक अडचणींमुळे अनुपस्थित राहिलेले किंवा अनुत्तीर्ण ठरलेले शिक्षक आता पुन्हा प्रशिक्षण घेऊ शकणार आहेत. राज्य शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे अनेक शिक्षकांना दिलासा मिळाला आहे. ३ नोव्हेंबरपर्यंत हे प्रशिक्षण चालणार आहे. विशेष म्हणजे, या शिक्षकांना पुन्हा नोंदणी शुल्क भरण्याची गरज राहणार नाही, अशी माहिती संघटनेचे सचिव संजय केवटे यांनी दिली. तांत्रिक अडचणीचा फटका अनेक शिक्षकांना बसला होता. काही शिक्षकांचे नाव प्रणालीमध्ये योग्यरीत्या समाविष्ट झाले नव्हते. तसेच काहींची उपस्थितीची नोंद झाली नव्हते.

## शहाड उड्डाणपुल दुरुस्तीचे काम रखडले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. २७** : कल्याण-नगर महामार्गावरील शहाड उड्डाणपुलाची दुरवस्था कायम असल्याने नागरिक, प्रवासी आणि वाहतूकदार वर्गामध्ये प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. पुलाची अवस्था 'महामार्ग' ऐवजी 'खड्डामार्ग' अशी झाली आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभागाने पुलाच्या दुरुस्तीसाठी २८ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर या काळात वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्याचे आश्वासन दिले होते; मात्र १५ दिवसांची ही बंदी वाया गेली असून, २६ ऑक्टोबरपर्यंतही पुलावर डांबर नसून खड्यांचे साम्राज्य आहे. दुरुस्तीच्या नावाखाली फक्त तात्पुरते आणि औपचारिक काम करून पूल पुन्हा उघडण्यात आल्याचा नागरिकांचा आरोप आहे. पुलावरील रस्त्याचे पृष्ठभाग पूर्णपणे उखडले असून, उंचसखल खाचांमुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अपघाताचा धोका कायम असून, दोन आणि चारचाकी वाहने अक्षरशः डोलत जातात.

### आमचं रस्त्यावरचं आयुष्य खड्ड्यांत का ....?

**शहाड पुलाची अवस्था बिकट असतानाच कल्याण-मुरबाड मार्गाची स्थितीही अत्यंत वाईट आहे. रस्त्यावरील खड्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. दोन्ही रस्त्यांवरील कामे ठप्प झाल्याने नागरिक आम्ही कर भरतो, मग आमचं रस्त्यावरचं आयुष्य अशा खड्यांत का अडकतंय, असा संतप्त सवाल प्रशासनाला करीत आहेत. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे नागरिकांचा रोष उफाळून आला आहे.**



## भिवंडीत छठ पूजेचा उत्साह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : उत्तर भारत व बिहार समाज बांधवांचा पवित्र समजला जाणारा " छठ पूजा "हा सण आज भिवंडी शहर परिसरात मोठ्या आनंदात आणि उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला. छठपूजा साठी शहरातील वऱ्हाळा तलाव व परिसरातील विसर्जन स्थळावर हजारो महिलांसह पुरुष भक्तांनी गर्दी केली होती. पतीच्या दीर्घायुष्या साठी तसेच आपल्या परिवाराच्या सुख शांती साठी समाज बांधवांकडून हा सण साजरा करण्यात येतो. उस आणि विविध प्रकारची फळांचा चौक जमिनीवर फुलांची आरास सजावट तयार करून पाण्यात उभे राहून मावळत्या सूर्याची यावेळेस पूजा करण्यात येते आणि दुसऱ्या दिवशी पहाटे उद्या सूर्योदय पुजा करून महिला भाविक आपले उपवास सोडतात. बिहार व उत्तर प्रदेश येथे या सणाला खूप महत्व आहे, या ठिकाणी हा सण मोठ्या आनंदात साजरा होतो . भिवंडी हा शहर सर्व धर्म समभावाचे प्रतिक म्हणून देशभर प्रसिद्ध आहे. विविध जाती धर्माचे लोक येथे राहतात , तसेच कामगार नगरी म्हणून भिवंडी सर्वपरिचित असल्याने बिहार व उत्तर भारतीय नागरिकांचे येथे वास्तव्य देखील मोठ्या प्रमाणात असल्यामुळे आज भिवंडीत हा सण मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. शहरातील वऱ्हाळ तलाव घाट,कामतघर घाट,फेणेगाव घाट,भादवड, नारपोली या तलावांसह कामवारी नदी पात्रात

पान ३ वर ▶▶▶




## आपला दवाखान्यातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचा पगार बँक गॅरंटीतून

**महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी आरोग्य विभागाला दिले निर्देश**

**केंद्र शासनाच्या नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिरे योजनेत ४३ दवाखाने सुरू**

**राज्य शासनाच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेत १२ दवाखाने सुरू**

दै.ठाणेजीवनदीपवार्ता

**ठाणे (२७)** : ठाणे (२७) : आपला दवाखाना चालवण्याची जबाबदारी असलेल्या मेड ऑन गो हेल्थ प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची सुमारे पावणे तीन कोटी रुपयांची बँक गॅरंटी तसेच, मे महिन्यापासून या कंपनीला देय असलेली रक्कम अशा दोन्ही रकमा ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत. आवश्यकतेनुसार त्या रकमांमधून आपला दवाखानासाठी नेमण्यात आलेल्या सर्व वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा पगार, जागांचे भाडे अदा करण्यात येणार आहे. त्यासंदर्भात, महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सुस्पष्ट निर्देश दिल्याची माहिती उपायुक्त (आरोग्य) उमेश बिरारी यांनी दिली आहे. त्याचबरोबर, नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी ठाणे महापालिका क्षेत्रात, महापालिकेच्या ३३ आरोग्य केंद्रांच्या

पान ३ वर ▶▶▶









## छठ पुजेचे पवित्र स्थळी शिवशांती प्रतिष्ठानने राबविले महास्वच्छता अभियान





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** छठ मातेचे पवित्र स्थळ स्वच्छ ठेवणे आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्याचे उद्देशाने छठ पूजेचे पवित्र स्थळ असलेले ठाणे येथील रायलादेवी तलाव परिसरात ॲड. विनय कुमार सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली शिवशांती प्रतिष्ठानच्या वतीने दि.26 ऑक्टोबर 2025 रोजी भव्य महास्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते. या अभियानामध्ये माजी नगरसेवक एकनाथ भोईर, रायलादेवी तलाव छठ पूजा सेवा समितीचे अध्यक्ष कुलदीप तिवारी, शिव परिवार प्रमुख पंडित राम मिलन शुक्ला, शिवशांती प्रतिष्ठानचे रंजीत (बादल) सिंह, SPL टीम, संस्कार ट्रस्टच्या लक्ष्मी मौर्या आणि त्यांचे शिक्षिका वर्ग, ॲड. शिक्षा संस्कार, जया विश्वकर्मा, शिवदूत कमलेश सिंह, अरविंद गिरी, दिलीप सिंह, दीपक गिरी, तसेच सर्व रिक्षा चालक बांधव, श्रद्धाळू, पर्यावरण प्रेमी आणि समाजसेवक उपस्थित होते.

सर्वांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी झाला. त्यामुळे ॲड. विनय कुमार सिंह यांनी सर्वांचे आभार मानले. तसेच छठ पुजेपूर्वी जशी आपण सर्वांनी रायलादेवी तलावाची स्वच्छता केली तशीच छठ पूजेनंतर सुद्धा परिसरातील नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून आपण पुन्हा सर्वांनी एकत्र येऊन शिवशांती प्रतिष्ठानच्या माध्यमातून तलाव स्वच्छ करण्यासाठी आयोजित महास्वच्छता अभियानामध्ये सहभागी होऊन सहकार्य करावे असे आवाहन विनय कुमार सिंह यांनी केले.

# विज्ञानरत्न डॉ जयंत नारळीकर

जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण स्वर्गीय डॉ जयंत नारळीकर यांना यंदाचा मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. विज्ञानरत्न हा वैज्ञानिक क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो. डॉ जयंत नारळीकर यांना मरणोत्तर का होईना हा पुरस्कार मिळाल्याने खगोलप्रेमींना कमालीचा आनंद झाला आहे कारण या पुरस्कारावर त्यांचा हक्कच होता. डॉ जयंत नारळीकर यांना हा पुरस्कार त्यांच्या हयातीतच मिळाला असता तर आणखी आनंद झाला असता पण असो देर आये दुरुस्त आये असे म्हणत या पुरस्काराचे स्वागत करायला हवे. डॉ जयंत नारळीकर यांचे याच वर्षी २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले होते त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे



मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## जिल्हास्तर युवा महोत्सवातील सहभागासाठी युवा मंडळांनी ऑनलाईन नोंदणी करावी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**रायगड :** राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या अनुषंगाने जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन दि.29 ऑक्टोबर 2025 या कालावधीत करण्यात येणार असून त्यामध्ये वक्तृत्व, कथालेखन, चित्रकला, लोकनृत्य (गट), लोकगीत (गट), कवितालेखन, नवोपक्रम (विज्ञानदर्शन) असे उपक्रम आहेत. या उपक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता 15 ते 29 वयोगटातील युवक-युवतींनी तसेच युवा मंडळांनी दि.28 ऑक्टोबर 2025 सायं.5 वाजेपर्यंत dsoraigad.२००९@rediffmail.com, द्वारे ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड प्रकाश वाघ यांनी केले आहे.

युवकांचा सर्वांगिण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढिस लागणे यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार करते. राज्यात सन 2025-26 या वर्षातील राष्ट्रीय युवा महोत्सव विकसित भारत चॅलेंज ट्रॅक चे आयोजन दि.10 ते 12 जानेवारी 2026 या कालावधीत करण्यात येणार आहे. अधिक माहितीकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, येथे संपर्क साधावा.

## कल्याणमध्ये रोबोटच्या सहाय्याने होणार गुडघ्यावरील शस्त्रक्रिया

**कल्पतरू रुग्णालयात रोबोटिक शस्त्रक्रिया केंद्राचे उद्घाटन**



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याणमध्ये रोबोटच्या सहाय्याने गुडघ्यावरील शस्त्रक्रिया होणार असून कल्याण पश्चिमेतील बैल बाझार चौकात कल्पतरू रुग्णालयात रोबोटिक शस्त्रक्रिया केंद्राचे उद्घाटन रविवारी करण्यात आले. शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे यांच्याहस्ते फित कापून या केंद्राचे उद्घाटन झाले. यावेळी महाराष्ट्र रेडीओलॉजी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील, इंडियन मेडिकल असोसिएशन कल्याणच्या अध्यक्षा डॉ. सुरेखा ईटकर, शिवसेना महिला उपजिल्हा प्रमुख नितु कोटक, कल्पतरू रूग्णालयाचे डॉ. जीवक घाडगे, डॉ. अश्विन पाटील, डॉ. तनुजा घाडगे, रवींद्र घाडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

कल्पतरू रुग्णालयाची स्थापना ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. जीवक घाडगे यांनी २०१४ मध्ये केली आहे. कल्पतरू हॉस्पिटल येथे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्यमान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी या सारख्या शासकिय आरोग्य योजना सुरू करणार आहे. तसेच कल्पतरू हॉस्पिटल मध्ये टोटल नी रीप्लेसमेंट व टोटल हिप रीप्लेसमेंट या सारख्या शस्त्रक्रिया या अत्याधुनिक रोबोटिक टेक्नॉलॉजीचा वापर करून केल्या जाणार आहेत. रुग्णांची शस्त्रक्रिये नंतर व विविध आजारांपासून रिकवरी लवकर व्हावी, उत्तम आरोग्य प्राप्ती व्हावी याकरिता कँगेन वाटर (अल्कलाइन वॉटर) मशीन बसविण्यात आली आहे. यासर्व नाविन्यपूर्ण उपक्रमांचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितित झाले असल्याची माहिती रुग्णालयाच्या वतीने देण्यात आली.

## बिलघर सरपंच मोतीराम नडगेंना आदर्श सरपंच पुरस्कार



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाडा :** २१ वर्षे शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे कार्य करत असताना अल्पावधीतच शिस्तप्रिय, विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून नावारूपाला आले. विशेषत: इंग्रजी व गणित विषयाची अत्यंत आवड असणाऱ्या नडगे सरांनी विद्यार्थ्यांच्या मनातील दोन्ही विषयांची भिती कमी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. ज्ञानदानाचे कार्य सुरु असतानाच २०२२ मध्ये बिलघर ग्रामपंचायतीचे प्रथम लोकनियुक्त सरपंच म्हणून निवडून आले. तेव्हापासुन आजतागायत अनेक लोकोपयोगी उपक्रम हाती घेऊन ते यशस्वीरीत्या राबवले. आरोग्य शिबिरे, शैक्षणिक साहित्याचे वाटप, महिला सबलीकरण, ग्रामस्वच्छता अभियान, माझी वसुंधरा, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन, आधार कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, विविध प्रकारचे दाखले वाटप ई. शिबिरे यशस्वीरीत्या राबवली. ह्यापूर्वी पंचायत समिती वाडा च्या वतीने २०२४/२५ चा उत्कृष्ट सरपंच म्हणून गौरव करण्यात आला होता. ह्या सर्व कार्याची दखल घेत लक्ष्य सेवाभावी संस्था यांच्या वतीने 'उत्कृष्ट सरपंच लक्ष्य पुरस्कार २०२५' देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. प्रसंगी जिजाऊच्या हेमांगी पाटील, कामगार नेते महेंद्र ठाकरे, पोलीस अधिकारी सागर मालकर, लक्ष्यचे अध्यक्ष किरण भोईर, कीर्ती भोईर तथा पदाधिकारी उपस्थित होते.

## अवकाळी पावसामुळे शेतकरी मेटाकुटीला

### झिडके–अंबाडी परिसरातील भातपिकांची अतोनात हानी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**झिडके-अंबाडी:** महाराष्ट्र राज्यात सर्वसाधारणपणे ऋतूचक्राप्रमाणे त्या-त्या ऋतूमध्ये हवामानाची स्थिती असते. ऊन्हाळा,पावसाळा व हिवाळा या ऋतूचक्रानुसार येथील जीवनमान अखंडित चालू असते. त्यामुळेच येथील प्रत्येक व्यवसाय हे नैसर्गिक परिस्थितीनुसार चालू असतात.



परंतु चालू वर्षांत पावसाळा ऋतू संपून एक महिना पार पडला असताना,माहे - ऑक्टोबर मध्ये संपूर्ण महिना अवकाळी पावसाची बरसात होत असल्यामुळेच भातपिक तयार झाली आहेत आणि त्यांची कापणीही झालेली आहे,परंतु भातपिक शेतात पाणी साचून पाण्यावर तरंगत आहेत अशी महाभयंकर परिस्थिती भिवंडी तालुक्यातील झिडके-अंबाडी परिसरात निर्माण झाल्यामुळेच येथील शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे.त्याचबरोबर तयार झालेल्या भातपिकांचे अतोनात नुकसान झाल्यामुळेच येथील शेतकरी चिंताग्रस्त असून,अक्षरशः शेतकऱ्यांवर रडण्याची पाळी आली आहे.कारण शेतीत एवढे काबाडकष्ट करून,अवकाळी पावसामुळे हातातोंडाशी आलेला घास या नैसर्गिक आपत्तीपासून आपण वाचवू शकत नाहीत,याचे अंत्यत्तीक दुःख सहन होण्यासारखी परिस्थिती सध्या अजिबातच नाही.याचे कारण असे की,हळव्या भातपिकाच्या वेळेसही कीटकांपासून आलेली रोगराई आणि आता गरव्या भातपिकांची जशी हाणी होत आहे, हीच परिस्थिती सद्यस्थितीत निर्माण झाली आहे,यातून काय मार्ग काढावा हा यक्ष प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे.त्यामुळेच कमालीची चिंता वाढली आहे.

एकतर आजकाल शेतीव्यवसाय महागडा झाला आहे,परंतु शेती हा परंपरागत व्यवसाय असल्यामुळेच शेतकरी कर्जबाजार करून आपली शेती लावत आहेत. त्यातून निसर्गाची अवकृपा होऊन तयार झालेली भातपिकांची हाणी ही शेतकऱ्यांसाठी असह्य वेदनादायक आहे.या संकटातून काय मार्ग निघेल का?हीच अपेक्षा ठेवणे एवढेच त्यांच्या नशीबी असणार आहे,की शासन त्यांच्या या आपत्तीपासून वाचविण्यासाठी काही प्रभावी उपाययोजना करणार आहे,हे पाहणेच बिचाऱ्या बळीराजाला अपेक्षित आहे.

## डिजिटल युगात सायबर साक्षरता आणि सावधगिरी महत्वाची

### - पुरुषोत्तम कराड

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** सध्याच्या इंटरनेटच्या जमाण्यात प्रत्येक पाऊल सावधपणे टाकण्याची आवश्यकता आहे. सावधगिरीबरोबर सायबर साक्षरताही महत्त्वाची आहे. सर्वसामान्य नागरिकांचे सायबर अज्ञान हे सायबर चोरांच्या पथ्यावर पडते. म्हणूनच आम्ही वेगवेगळ्या माध्यमातून जनजागृती करण्यावर भर दिला आहे. शासकीय, खाजगी कार्यालय, गृहनिर्माण संस्था, शाळा महाविद्यालये तसेच समाज माध्यमांवरून सायबर गुन्ह्यांपासून सावध राहण्याबाबत मोठ्या प्रमाणात मार्गर्शन केले जात आहे. असे मुंबई सायबर पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांनी सायबर गुन्हेगारी आणि साक्षरता या विषयांवर बोलताना सांगितले.

घरातील वस्तू खरेदीपासून ते बँकांचे, बड्या कंपन्यांचे सर्व आर्थिक व्यवहार हल्ली ऑनलाइन पद्धतीने केले जातात. डेबिट-क्रेडिट कार्डचा वापर वाढला आहे. ऑनलाइन बँकिंग, खरेदीसाठी ॲपचा वापर, बँकेतील पैसे ऑनलाईन ट्रान्सफर हे सध्या सारेच करतात. त्यामुळे वेळ वाचतो, आर्थिक व्यवहार जलद गतीने होतात आणि पारदर्शकता असते. मात्र हे करताना त्यातील पूर्ण ज्ञान असणे महत्त्वाचे आहे. जिथे पैसा तिथे धोका सर्वाधिक असतो हे लक्षात घ्यायला हवे. अपघातातील जखमीला गोल्डन अवरमध्ये



अपप्रचार असेही प्रकार सुरू आहेत. त्यामुळे इंटरनेटच्या जगात वावरताना सावधगिरी गरजेची आहे. विशेष म्हणजे लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींच्या हातामध्ये इंटरनेट वापर आणि मोबाईल देताना जरा जपून राहावे. पोलिसांच्या वतीने जनजागृती, सायबर सुरक्षा सुरूच असते. सर्वसामान्य नागरिकांनी ही बाब गांभीर्याने घ्यावी. घरातील ज्यांना सायबर गुन्ह्याबाबत माहिती आहे त्यांनी कुटुंबातील सदस्यांना सायबर साक्षर केले पाहिजे. तसेच डिजिटल अटक किंवा सायबर गुन्ह्यात आर्थिक फसवणूक झाल्यास लगेच १९३० वर संपर्क साधावा असे आवाहन पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांनी केले आहे.

## 'दक्षता जनजागृती सप्ताह' निमित्त कोकण भवनात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ


**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई :** "जीवनाच्या सर्व क्षेत्रात सच्चेपणा आणि कायद्याचे पालन करेन, लाच घेणार नाही आणि लाच देणार नाही, सर्व कामे प्रामाणिकपणे आणि पारदर्शक पध्दतीने करेन, जनहितासाठी कार्य करेन" अशी प्रतिज्ञा घेऊन भ्रष्टाचाराविरुध्द जनजागृती होण्याच्या उद्देशाने आज कोकण भवनमध्ये 'दक्षता जनजागृती सप्ताहाचा' प्रारंभ करण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या बैठक सभागृहात सकाळी 11.00 वाजता कोकण भवनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. दरवर्षी 31 ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई



पटेल यांची जयंती साजरी करण्यात येते, त्या सप्ताहात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जातो. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा आणि सत्यनिष्ठा याबद्दलच्या दृढनिश्चयाचे बळकटीकरण करण्यासाठी नागरिकांच्या सहभागाने हा सप्ताह साजरा करण्यात येतो. यंदाच्या 2025 या वर्षी केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार 28 ऑक्टोबर ते 03 नोव्हेंबर 2025 या कालावधीत या 'दक्षता जनजागृती सप्ताहाचे' आयोजन करण्यात आले आहे. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त जनतेला संदेशाचे वाचन केले. कोकण भवनमधील विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त




प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण




- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in




**मेष**
योग्य परिश्रमातून बऱ्यापैकी समाधान आणि आनंदाचा लाभ घेता येईल. आपल्या अधिकाराचा दुरुपयोग टाळा. धंद्यात काम मिळेल.

**वृषभ**
नोकरीत अनुकूलता लाभेल. नवे निर्णय घेता येतील. विरोधकांना पुढे सरकू देऊ नका. कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

**मिथुन**
एखाद्या समस्येवर उपाय शोधता येईल. आनंदी राहाल. सावधपणे काम करा. आपली प्रतिष्ठा शाबूत ठेवता येईल. स्पर्धेत जिंकाल.

**कर्क**
कालचक्र अधिक वेगवान ठेवता येईल. संयमाने आपला कार्यभाग साधावा लागणार आहे. आपल्या विचारांना चालना मिळेल.

**सिंह**
अनेक प्रांतांमध्ये आपला प्रभाव राहील. महत्त्वाची कामे आणि प्रकरणांना चालना देता येईल. स्पर्धा आणि साहसी कृत्ये टाळा.

**कन्या**
बौद्धिक युक्तीचा वापर करून बऱ्यापैकी प्रगती साधता येईल. मन उत्साहित होईल. समस्या सोडवण्याचा मार्ग शोधता येईल.

**तूळ**
सध्या मोठ्या योजनांचा विचार करणे योग्य नाही. आपली स्थगित प्रकरणे पुढे सरकवता येतील. नव्या कार्याला दिशा मिळेल.

**वृश्चिक**
मोठी खरेदी करताना घाई करू नका. ठरवलेले काम पूर्ण करता येईल. कोणताही वाद वाढू देऊ नका. मान आणि प्रतिष्ठा मिळेल.

**धनु**
कामकाजात तडफदारी दिसून येईल. सामाजिक कार्यात प्रतिष्ठा मिळेल. प्रवासात घाई करू नका. आवडत्या क्षेत्रात प्रगती होईल.

**मकर**
वादाचे प्रसंग टाळा. व्यवहारात सावधानता बाळगा. आपल्या योजना आणि संकल्पांना उत्तेजन मिळेल. आरोग्याची काळजी घ्या.

**कुंभ**
नव्या क्षेत्रात प्रवेश करणे आपणास शक्य होणार आहे. घरातील वातावरण प्रसन्न राहील. प्रवासाचे योग येतील. नवीन ओळख होईल.

**मीन**
धंद्यात नव्या कामाचा शोध घ्याल. विरोधकांची धास्ती बाळगू नका. प्रवासाचा बेत ठरवाल. पदाधिकार मिळण्याची शक्यता आहे.

नियमित वाचा
दैं. ठाणे जीवनदीप वार्ता

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत

# भारतीय जनता पार्टीच्या नव्या मुख्यालयाचं भूमिपूजन संपन्न



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनीधी**

**मुंबई** : भारतीय जनता पार्टीच्या मुंबई येथे उभारण्यात येत असलेल्या नवीन मुख्यालयाचा भूमिपूजन सोहळा आज केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री आदरणीय अमितभाई शाह आणि आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी 'चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, आशिष शेलार, पंकजाताई मुंडे, राधाकृष्ण विखे पाटील, गिरीष महाजन, अतुल सावे, मंगलप्रभात लोढा, जयकुमार गोरे, आकाश फुंडकर, अशोक उईके, संजय सावकारे आदी महाराष्ट्र मंत्रिमंडळातील मंत्री, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार नारायण राणे, खासदार ॲड. उज्ज्वल निकम, महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, महाराष्ट्र विधान परिषद सभापती राम शिंदे, भाजपा मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, आ. प्रवीण दरेकर, संघटन मंत्री राजेश पांडे, संघटन मंत्री माधवीताई नाईक, संघटन मंत्री आ. विक्रांत पाटील यांच्यासह अन्य मान्यवर आणि मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

> **राष्ट्र प्रथम, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः या मार्गावर वाटचाल करणाऱ्या प्रत्येक भाजपा सदस्यासाठी पक्ष कार्यालय हे एखाद्या मंदिराइतकेच पवित्र आहे. प्रदेशाध्यक्ष या नात्याने मुख्यालय उभारणीची मोलाची जबाबदारी माझ्या खांद्यावर आली आहे, हे माझे भाग्य समजतो.**
> ■ **रवींद्र चव्हाण प्रदेशाध्यक्ष, भाजपा महाराष्ट्र प्रदेश**

# महाराष्ट्र नेत्रतज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. अनघा हेरूर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** : ठाणे जिल्ह्यातील सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ आणि अनिल आय हॉस्पिटलच्या वैद्यकीय संचालक डॉ. अनघा हेरूर यांची महाराष्ट्र ऑप्थाल्मॉलॉजिस्ट सोसायटी (एमओएस) या भारतातील सर्वात मोठी नेत्रतज्ज्ञांची संघटनेच्या अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील नेत्ररोग क्षेत्राची नवी उंची गाठली जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. ३५ वर्षांची अखंड रुग्णसेवा आणि नेतृत्व डॉ. अनघा हेरूर या गेली ३५ वर्षे नेत्ररोग क्षेत्रात रुग्णसेवेत कार्यरत आहेत. त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली 'अनिल आय हॉस्पिटल'ने डोंबिवली, ठाणे, कल्याण, पलावा आणि बदलापूर येथे सात सुपरस्पेशालिटी नेत्ररुग्णालयांचा विस्तार साधला असून, संस्था यावर्षी ५३ वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण करत आहे. त्यांनी आजवर लाखो रुग्णांना नेत्रारोग्य सेवा दिली असून मोतीबिंदू, काचबिंदू, रेटिनाचे आजार, लेसिक शस्त्रक्रिया व इतर नेत्रशस्त्रक्रियांमध्ये त्यांना विशेष प्राविण्य आहे. त्यांच्या कुशल हातून असंख्य रुग्णांना पुन्हा स्पष्ट दृष्टी लाभली आहे.



## कल्याण डोंबिवलीकरांसाठी

# लवकरच सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी!

**आचार्य अत्रे रंगमंदिरात दिनांक 29 ऑक्टोबर रोजी ज्येष्ठ नागरिक महोत्सव आणि दिनांक 30 ऑक्टोबर रोजी महापालिका अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : आचार्य अत्रे रंगमंदिरात दिनांक 29 ऑक्टोबर रोजी ज्येष्ठ नागरिक महोत्सव आणि दिनांक 30 ऑक्टोबर रोजी महापालिका अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण दिनांक एक ऑक्टोबर रोजी असणाऱ्या ज्येष्ठ नागरिक दिन व महापालिका वर्धापन दिनाचे औचित्य साधून दिनांक 29 ऑक्टोबर सकाळी 10.00 वाजल्यापासून ज्येष्ठ नागरिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे तर दिनांक 30 ऑक्टोबर रोजी दुपारी 3.00 वाजल्यापासून महापालिका अधिकारी/ कर्मचारी वर्गाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे बहारदार सादरीकरण केले जाणार आहे.

यामध्ये दिनांक 29 ऑक्टोबर रोजी महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ,ज्येष्ठ नागरिकांनी सादर केलेले संगीत, नृत्य व नाट्य सादरीकरण, निवडक हास्य कविता व विडंबन गीते सादरीकरण, आरोग्य विषयक मार्गदर्शन, ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महापालिका क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करणे आणि सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागाची संधी देऊन त्यांचा आनंद वृद्धिंगत करणे ,त्यांच्या आनंदी आयुष्यासाठी एक व्यासपीठ निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे . दिनांक 30 ऑक्टोबर रोजी क्रीडा व सांस्कृतिक विभागामार्फत महापालिकेच्या अधिकारी / कर्मचारी वर्गाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले जाणार आहे.

# नव उद्योजकांनाही भांडवली कर्ज द्या !

## शरद पवार गटाची एलआयसीवर धडक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे, ता. २७** : अदाणी समूहाला आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी मोदी सरकारने भारतीय आयुर्विमा महामंडळाचा (एलआयसी) वापर केला. एलआयसीवर दबाव आणून 'अदाणी'च्या कंपन्यांमध्ये ३३ हजार कोटी रुपये गुंतवण्यास भाग पाडले आहे. एकीकडे अदाणी समूहाला एवढी मोठी रक्कम दिली जात असताना सर्वसामान्य तरुण उद्योजकांना साधे लाखभर रुपयाचेही कर्ज दिले जात नाही. याचा निषेध करण्यासाठी तसेच तरुणांनाही उद्योगासाठी भांडवली कर्ज द्यावे, या मागणीसाठी डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार पक्षाने जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांच्या नेतृत्वात एलआयसी कार्यालयावर धडक दिली. या वेळी एलआयसी अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तरुण बेरोजगारांना व्यवसाय करण्यासाठी कर्ज द्यावे, अशी मागणी केली. अदाणी समूहातील कंपन्यांनी गैरव्यवहार केल्याचा ठपका ठेवून अमेरिकेत या कंपन्यांविरोधात चौकशी सुरू आहे. त्यामुळे अदाणी समूहावरील कर्जाचे ओझे वाढले आहे. त्यातून गौतम अदाणी यांना बाहेर काढण्यासाठी केंद्र सरकारने एलआयसीवर दबाव आणून अदाणी समूहात सुमारे ३३ हजार कोटींची गुंतवणूक करण्यास भाग पाडले आहे. एकाच माणसावर मेहरबान होऊन सर्वसामान्य जनतेचा पैसा उधळण्यास आपला विरोध आहे, असे म्हणत राष्ट्रवादी शरद पवार गटाने हे आंदोलन केले. सोमवारी (ता. २७) रोजी शेकडो कार्यकर्त्यांनी, मोदी सरकार हाय-हाय, मोदी-अदाणी भाई भाई, अशा घोषणा व फलक झळकावत एलआयसी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली.



## माजी आमदार सुभाष भोईर यांचा

# मुख्यमंत्री सहायता निधीसाठी १५ लाखांचा धनादेश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर परतीचा पाउस झाल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. पावसामुळे संपूर्ण शेती पाण्याखाली गेली, जमीनी खरवडून गेल्या, जनावरे दगावली, घरांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी शिरल्यामुळे संसार वाहून गेला, निसर्गाच्या प्रकोपापुढे शेतकरी हतबल झाला. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मदतीचे पॅकेज जाहीर केले. कल्याण ग्रामीणचे माजी आमदार सुभाष भोईर यांनी बळीराजाला दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये १५ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हाती सुपूर्त केला.

## अवजड वाहनांच्या घुसखोरीसाठी

# कसाऱ्यात समाजकंटकांनी चक्क हाईट बॅरिगेट कापले

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

कसारा-मोखावणे गावाला जोडणाऱ्या ब्रिटिशकालीन पुलावरून अवजड वाहनांची बेकायदा वाहतूक सुरू आहे. धक्कादायक म्हणजे अवजड वाहनांची घुसखोरी थांबवण्यासाठी लावण्यात आलेला हाईट बॅरिगेट समाजकंटकांनी कटर मशीनच्या मदतीने कापला आहे. त्यामुळे हा ब्रिटिशकालीन पूल धोकादायक झाला असून तो कोसळण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासनाला जाग येणार का असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

कसारा-मोखावणे गावाला जोडणारा ब्रिटिशकालीन पूल धोकादायक झाल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने दीड कोटी रुपये खर्च करून त्या पुलाची डागडुजी केली. मात्र दुरुस्तीच्या कामानंतर हा पूल अनेक वर्ष बंद होता. अखेर ग्रामस्थांना दिलासा देत प्रशासनाने लहान वाहनांसाठी हा रस्ता सुरू केला. या पुलावरून जड अवजड वाहनांची वाहतूक होऊ नये यासाठी प्रशासनांकडून हाईट बॅरीगेट लावण्यात आले.

मात्र काही समाजकंटकांनी या पुलावरील बॅरिगेट कापून बाजूला केले. या अवजड वाहनांमुळे स्थानिकांची सुरक्षा धोक्यात आली असून पुलालाही धोका निर्माण होण्याची शक्यता ग्रामस्थांनी वर्तवली आहे.

# आपला दवाखान्यातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचा पगार बँक गॅरंटीतून

पान १ वरून ▶▶▶ जोडीने, केंद्र शासनाच्या योजनेतून नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिरे या योजनेत ४३ दवाखाने सुरू करण्यात आले आहेत. तर, राज्य शासनाच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या योजनेत १२ दवाखाने सुरू करण्यात आले आहेत. नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिरे या योजनेत आणखी २५ दवाखाने नोव्हेंबर २०२५ अखेरपर्यंत सुरू करण्याचे नियोजन असल्याची माहितीही उपायुक्त उमेश बिरारी यांनी दिली.

'आपला दवाखाना' या उपक्रमाबाबत गेले काही दिवस प्रसारमाध्यमांमधून सातत्याने वृत्त येत आहेत. त्यात, हा उपक्रम बंद करून, कार्यरत डॉक्टर आणि कर्मचारी यांचे पगार थकले असल्याचा उल्लेख आहे. यासंदर्भात, महापालिकेच्या आरोग्य विभागाने सोमवारी महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे पत्रकार परिषद घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट केली. उपायुक्त उमेश बिरारी यांनी या पत्रकार परिषदेत या संपूर्ण उपक्रमाची वस्तुस्थिती विशद केली. त्यावेळी, महापालिकेच्या माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. वर्षा ससाणे उपस्थित होत्या.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात महासभा ठराव क्र.२३, दि. २१/०६/२०१९ अन्वये निविदा प्रक्रिया राबवून 'आपला दवाखाना' कार्यान्वित करण्यासाठी मे. मेड ऑन गो हेल्थ प्रा.लि या कंपनीची निवड करण्यात आली. दि. ३१/०७/२०२० रोजी त्यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.

यासंदर्भात, ठाणे महानगरपालिकेचा आरोग्य विभाग, वैद्यकीय आरोग्य अधिकारी व मे. मेड ऑन गो हेल्थ प्रा.लि या दोन पक्षांमध्ये करारनामा करण्यात आलेला आहे. या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मे. मेड ऑन गो हेल्थ प्रा.लि. यांनी शहरामध्ये एकूण ५० दवाखाना सुरू करणे आवश्यक होते. सदर कार्यादेश अन्वये डिसेंबर २०२० मध्ये पहिल्या टप्प्यात ०६ ठिकाणी आपला दवाखाना केंद्र सुरू करण्यात आले. परंतु, संपूर्ण करार कालावधीत सदर संस्था केवळ ४६ दवाखाने सुरू करू शकली. ही वस्तुस्थिती आहे. 'आपला दवाखाना' यांना कार्यादेश अंमलबजावणी दिनांकापासून (०१/०८/२०२० ते ३१/१०/२०२५) कालावधीकरिता म्हणजे ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अर्थात, हा आदेश पारित केल्यानंतरही दि. १४/०८/२०२५ पासून आजपर्यंत संस्थेने एकही दवाखाना चालू केलेला नाही. या दवाखान्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबी जसे की, जागेकरीता येणारे भाडे, पाणी, वीज देयके, इंटरनेट कनेक्शन, एमबीबीएस डॉक्टर, परिचारिका, औषधे, इतर सामुग्री उपलब्ध करुन देण्याची संपूर्ण जबाबदारी करारानुसार मे. मेड ऑन गो हेल्थ प्रा.लि यांची आहे. तसेच, प्रत्येक आपला दवाखान्यामध्ये कार्यरत असणाऱ्या वैद्यकीय अधिकारी, संबंधित कर्मचाऱ्यांचे व सहकाऱ्यांचे वेतन अदा करण्याची संपूर्ण जबाबदारी ही त्यांचीच आहे.

आपला दवाखाना येथे तपासणी करिता येणाऱ्या रुग्णांसाठी प्रतिरुग्ण रु. १५०/- प्रमाणे महापालिकेमार्फत देयके अदा करण्यात येत आहे. संस्थेने सुरक्षा अनामत म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडियामधून रु. २,८९,०२,८००/- ची बँक गॅरंटी महापालिकेकडे जमा केलेली आहे. सदर बँक गॅरंटी दिनांक २१/१०/२०२६ पर्यंत ग्राह्य आहे.

संस्थेने आता त्यांच्या आपला दवाखानामध्ये कार्यरत वैद्यकीय अधिकारी, इतर कर्मचारी यांना किती वेतन देण्यात आले आहे, याचा तपशील महापालिकेकडे सादर केलेला आहे. त्याची शहानिशा करून एप्रिल ते ऑगस्ट २०२५ या काळातील थेट कर्मचाऱ्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अदा करण्याबाबत महापालिका निर्णय घेईल. त्यासाठी संस्थेची पावणे तीन कोटींची बँक गॅरंटी व देयकांची रक्कम महापालिकेकडे आहे. त्यातून, सन्माननीय लोकप्रतिनिधींकडून आलेल्या सूचनांनुसार वेतन अदा करण्यात येईल, असेही उपायुक्त उमेश बिरारी यांनी स्पष्ट केले.

# भिवंडीत छठ पूजेचा उत्साह

पान १ वरून ▶▶▶ हजारोंच्या संख्येने महिला व नागरिक भाविकवर्ग पूजा करण्यासाठी सायंकाळी एकत्रित झाले होते.

त्यामुळे समाज बांधवांचे स्वागत करण्यासाठी सामाजिक संघटनांनी स्वागतकक्ष उभारून येथे उत्तर भारतीय गीत कार्यक्रमांचे आयोजन केले होते.आमदार महेश चौघुले,शिवसेनेचे माजी उपमहापौर मनोज काटेकर, माजी सभागृह नेते सुमित पाटील,माजी नगरसेवक नारायण चौधरी, निलेश चौधरी,साईनाथ पवार,हनुमान चौधरी,सामाजिक कार्यकर्ते पी.डी. यादव, सुरजपाल यादव यांच्यासह मान्यवरांनी उत्तर भारतीय समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या.या निमित्त महापालिका प्रशासनाने सुद्धा छठ पूजे कार्यक्रमसाठी वऱ्हाळ तलाव विसर्जन घाटाची स्वच्छता करून सर्व ठिकाणी विशेष विद्युत व्यवस्था केली आहे. ऐन सूर्य मावळतीच्या वेळेस पावसाने हजेरी लावल्याने काही काळ महिला भाविकांची तारांबळ उडाली होती मात्र तरीही छठपूजा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.







# शेतकऱ्यांचा आक्रोश शासनापर्यंत पोचेल का?

**कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे आयुष्य पुन्हा एकदा पावसाच्या टोकावर लोंबत आहे. गेल्या काही आठवड्यांपासून मुसळधार पावसाने अक्षरशः थैमान घातले असून, भातशेतीसाठी वरदान ठरणारा पाऊस आता शेतकऱ्यांच्या विनाशाचे कारण बनला आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास वाहून जात असताना शासन आणि लोकप्रतिनिधी मात्र आगामी नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या राजकारणात गर्क आहेत. स्वतःचा मुलगा, सून, पुतण्या किंवा भाचा यांना उमेदवारी कशी मिळेल, कोणत्या समितीचा अध्यक्षपद कसे मिळवता येईल — या गणितात राजकारणी व्यस्त आहेत.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**महाड** — कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे आयुष्य पुन्हा एकदा पावसाच्या टोकावर लोंबत आहे. गेल्या काही आठवड्यांपासून मुसळधार पावसाने अक्षरशः थैमान घातले असून, भातशेतीसाठी वरदान ठरणारा पाऊस आता शेतकऱ्यांच्या विनाशाचे कारण बनला आहे.

शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास वाहून जात असताना शासन आणि लोकप्रतिनिधी मात्र आगामी नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या राजकारणात गर्क आहेत. स्वतःचा मुलगा, सून, पुतण्या किंवा भाचा यांना उमेदवारी कशी मिळेल, कोणत्या समितीचा अध्यक्षपद कसे मिळवता येईल — या गणितात राजकारणी व्यस्त आहेत.

गेल्या सात महिन्यांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने कोकणातील शेती अक्षरशः उध्वस्त केली आहे. हजारो हेक्टर क्षेत्रातील भात, नागली आणि वरई पिकं चिखलात गाडली गेली आहेत. सुरुवातीला दमदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हसू आता निराशेच्या ओलसर रेषांनी बदलले आहे. चार मेपासून सुरू झालेला पाऊस थांबायचं नाव घेत नाही. नद्या, नाले, ओढे ओसंडून वाहत आहेत, तर शेतं पाण्याखाली गेली आहेत. गेल्या वर्षी दुष्काळाचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांवर यंदा अतिवृष्टीचा प्रकोप ओढवला आहे.

भातपिकं लोंब्या काढत असतानाच पावसाने सगळं बिघडवलं आहे. सततच्या पावसामुळे आणि ऊन न मिळाल्याने भातपिकं कुजण्याच्या मार्गावर आहेत. या वर्षी कोकणात सुमारे ४,००० मि.मी. पाऊस पडला — म्हणजे गेल्या वर्षाच्या दुप्पट! तरीही शासनाने "ओला दुष्काळ" घोषित करण्याची तयारी दाखवलेली नाही.

कोकणातील प्रत्येक तालुक्यातील परिस्थिती गंभीर असून शेतकऱ्यांच्या मागण्या अगदी स्पष्ट आहेत — शासनाने तात्काळ "ओला दुष्काळ" जाहीर करावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर नुकसानभरपाई द्यावी, रोगग्रस्त पिकांसाठी मोफत औषध आणि खत वितरण सुरू करावे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष शेतात जाऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा.

■ **हातातोंडाशी आलेला घास मातीमोल झाला**

शेतकऱ्यांच्या शेतातील माती केवळ जमीन नाही — ती त्यांच्या घामाची, मेहनतीची आणि अस्तित्वाची ओळख आहे. पण आज हीच माती चिखलात रूपांतरित झाली असून त्या चिखलात शेतकऱ्यांची स्वप्नं, आशा आणि भविष्य बुडत आहे. शासनाची उदासीनता आणि लोकप्रतिनिधींचं निवडणूक व्यस्तता हेच शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळत आहे.

आता वेळ आली आहे की मायबाप सरकार आणि लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करावेत, त्यांचे अश्रू पुसावेत. पण सध्याची स्थिती अशी की, सगळेच सत्तेच्या खेळात गुंतले आहेत — आणि शेतकरी पुन्हा एकदा एकटा पडला आहे.

## रोगराईचा प्रादुर्भाव, खतं-औषधं वाया

अतिपावसामुळे भातपिकांवर बगळा आणि खोडकिडीचा प्रादुर्भाव वाढला आहे. रोगनियंत्रणासाठी औषधफवारणी अपरिहार्य असली तरी सततच्या पावसामुळे ती करणे अशक्य झाले आहे. परिणामी, शेतकऱ्यांच्या घरात साठवलेले युरिया खत पाण्यात भिजून वाया जात आहे. आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर औषध आणि खतांचा अतिरिक्त भार पडला आहे. शासनाकडून मोफत औषध किंवा मदतीची कोणतीही हालचाल नाही. "शेतकरी अडचणीत आला की सरकारला फक्त 'आढावा बैठक' आठवते," असा शेतकऱ्यांचा संताप आहे. सत्ताधाऱ्यांचे दौरे, फोटोसेशन आणि आश्वासनं सुरू राहतात, पण शेतकऱ्यांच्या डोळ्यांतून आशा वाहून जातात. मतांच्या हंगामात "शेती हे आमचं प्राधान्य" असं सांगणारे लोकप्रतिनिधी आज मौन बाळगून बसले आहेत. शेतकऱ्यांच्या आयुष्यावरचं पाणी वाहून गेलं, पण सत्ताधाऱ्यांच्या चेहऱ्यावरची संवेदना मात्र सुकलेली दिसते.



# "वॉक फॉर युनिटी" कार्यक्रमात नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : सरदार वल्लभभाई पटेल यांची 150 वी जयंती साजरी करण्यात येणार आहे. या जयंतीनिमित्ताने "वॉक फॉर युनिटी"चे कार्यक्रमामध्ये 5 किलोमिटर वॉक दि.30 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 6.30 वाजता साकेत मैदान येथून सुरू करण्यात येवून त्याच ठिकाणी ड्राईव्ह परत येवून पूर्ण करण्यात येणार आहे. ही ड्राईव्ह ठाणे पोलीस आयुक्तालय व ठाणे शहरातील नागरिकांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात येणार असल्याने या ड्राईव्हमध्ये ठाणे शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घेवून "वॉक फॉर युनिटी" या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन पोलीस मुख्यालय, ठाणे शहर राखीव पोलीस निरीक्षक यांनी केले आहे.

# मनसेच्या कौस्तुभ देसाईंच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : हे जनसंपर्क कार्यालय हे केवळ राजकारणाचे नाही, तर जनसेवेचे केंद्र असेल. आम्ही या कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या, तक्रारी व स्थानिक विकासकामांबाबत सदैव तत्पर राहू असे आश्वासन मनसे नेते तथा माजी आमदार राजू पाटील यांनी दिले. मनसे महिला सेना शहर अध्यक्षा तथा माजी नगरसेविका कस्तुरी देसाई आणि मनसेचे माजी शहर अध्यक्ष कौस्तुभ देसाई यांच्या रामबाग रोड नंबर 4 चिकनघर येथील जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते व माजी आमदार राजू पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. या प्रसंगी राजू पाटील यांनी मनसेच्या व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी , कार्यकर्त्यांनी व स्थानिक नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी आमदार तथा मनसेचे सरचिटणीस प्रकाश भोईर, जिल्हा अध्यक्ष उल्हास भोईर, माजी नगरसेवक पवन भोसले, महिला सेनेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष उर्मिला तांबे, जिल्हा सचिव वासंती जाधव, उपजिल्हा अध्यक्षा सुनीता शेलार, शहर सचिव माजी नगरसेविका लक्ष्मी बोरकर, शहर सचिव अर्चना चिंदरकर आदी सर्व मनसैनिक,पदाधिकारी कार्यकर्ते, महिलासेना उपस्थित होते. तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण शहराध्यक्ष बाळा परब, विभाग अध्यक्ष रोहित भोईर, महिला सेनेच्या लोकसभा संपर्क अध्यक्ष राजलक्ष्मी अंगारके, गोकुळ पाटील, श्याम मेमाणे आदी शिवसैनिक, युवा सेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी राजू पाटील यांनी भाजपसह एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीका केली. आमचे मागचे शिलेदार यांच्या कार्यालयाचे उद्घाटन आम्ही सुरू करणार आहोत त्याची सुरुवात या ठिकाणहून झालेली आहे. सगळीकडेच मतदार यादी मध्ये घोळ आहे. मी स्वतः कल्याण ग्रामीण मधील दोन पॅनलची चाचणी केली. दिवा मधील दोन पॅनल मध्ये 16 हजार 798 दुबार मत मिळाली आहे. त्यामध्ये एका माणसाची पाच मत आहेत, ही लोकं खोटेपणा करून सत्तेत आलेले आहेत यापुढे त्यांचे खोटारडेपणा चालू नाही, यासाठी एक तारखेला आम्ही मोर्चा देखील काढणार असल्याचे राजू पाटील यांनी सांगितले. प्रत्येक मतदार यादी तपासून बघा बोगस मतदार असतील. तर तुम्ही निवडणूक बॅलेट पेपर वरती घ्या किंवा ईव्हीएम वरती घ्या कोणी निवडून येणार नाही त्यामुळे याद्या फिल्टर करायचं काम करण्याचे आवाहन पाटील यांनी केले.

# परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा** : तालुक्यात परतीच्या पावसाने मोठा कहर केला आहे. ऑक्टोबर महिन्यात सतत सुरू असलेल्या पावसामुळे भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, तयार भात पीके आडवे होऊन पाण्यात भिजत असल्याचे चित्र आहे. तालुक्यात जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या कालावधीत देखील पिकांचे नुकसान झाले होते. सप्टेंबर अखेरपासून सुरू झालेल्या परतीच्या पावसामुळे नुकतेच कापणीला आलेले भातपीक पुन्हा बाधित झाले. त्यातच गेल्या आठवडाभरात संध्याकाळच्या सरींनी अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचून पिके आडवी झाली तर काही ठिकाणी भाताचे रोप चिखलात गाडले गेले आहेत. पिकावर खूप कष्ट घेतले, पण कापणीच्यावेळी पावसामुळे सगळेच प्रश्न निर्माण झाले आहेत, धान्य वाचवणे कठीण होत चालले आहे. त्यातच हवामानखात्याने पुढील काही दिवस पावसाचा अंदाज वर्तवल्याने शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या असून हवालदिल शेतकऱ्यांनी तातडीने नुकसानभरपाईची मागणी केली आहे. यंदाच्या ऑक्टोबर महिन्यात नेहमीचा ऑक्टोबर हिट अनुभवायला मिळालेला नाही. उलट गेल्या काही दिवसांपासून हवामानात अनिश्चिततेचे चित्र दिसत आहे. एकीकडे पावसाच्या सरी, दुसरीकडे थंडावा आणि अधूनमधून उन्हाची झळ त्यामुळे पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा असा तिन्ही ऋतूंचा अनुभव एकाचवेळी येत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. हवामानातील अचानक बदल शेती उत्पादनावर थेट परिणाम करतो आहे.

# कल्याण फाटा ते कळंबोली आठ पदरी महामार्ग करा

## माजी आमदार सुभाष भोईर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : जुना मुंबई - पुणे राष्ट्रीय महामार्गावर कल्याणफाटा ते कळंबोली पर्यंत मोठ्या प्रमाणावर अवजड वाहनांची वाहतूक होत असते. उरण जे.एन.पी.टी. बंदरातून दररोज सुमारे वीस ते पंचवीस हजार कंटेनर, अवजड वाहने नाशिक, गुजरात तसेच इतर राज्यांमध्ये येत - जात असल्यामुळे वाहतूक कोंडीचा मोठा सहन करावा लागतो. याच परिसरात लोकनेते दि. बा. पाटील नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यामुळे या महामार्गावरून भविष्यात मोठ्या प्रमाणावर वाहतूक वाढणार आहे. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेला चार पदरी महामार्ग आठ पदरी करावा अशी मागणी कल्याण ग्रामीणचे माजी आमदार सुभाष भोईर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून पत्राद्वारे केली आहे. त्यावर सकारात्मकता दर्शवून तातडीने प्रस्ताव तयार करण्यास मुख्यमंत्र्यांनी सबंधीताना सांगितले आहे. दक्षिणेकडून उत्तरेकडे जाणारा हा एकमेव महामार्ग आहे. सदरचा महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीत येतो. सदरचा चार पदरी महामार्ग अपुरा पडत असून तो आठ पदरी केल्यास मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी दूर होवून प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. या महामार्गावरून पुणे, मुंबई तसेच कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावार वाहतूक होत असते.

या महामार्गावर अवजड वाहन बंद पडले अथवा अपघात झाला तर या महामार्गावर प्रचंड मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे कल्याण फाटा ते कळंबोली महामार्ग आठ पदरी करण्यासाठी माजी आमदार सुभाष भोईर यांचा सतत पाठपुरावा असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मकता दर्शविली आहे.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे डोंबिवलीत धडक कारवाई

## डोंबिवली रेल्वे स्थानक परिसरात अनाधिकृत फेरीवाल्यांविरुध्द फ आणि ग प्रभागाची संयुक्त धडक कारवाई !



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** :महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार डोंबिवली रेल्वे स्थानकालगतचा (फ आणि ग प्रभागक्षेत्र) परिसर तेथील नागरिकांसाठी/पादचाऱ्यांसाठी मोकळा ठेवण्याकरिता कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी शनिवार दि.24/10/2025 व रविवार दि.25/10/2025 रोजी फ प्रभागाच्या सहा.आयुक्त हेमा मुंबरकर व ग प्रभागाचे सहा. आयुक्त भारत पवार यांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने व आपल्या पथकाच्या मदतीने डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक परिसरातील अनाधिकृत फेरीवाल्यांविरुध्द धडक कारवाई केली. तसेच शहराचे विद्रुपीकरण करणारे 65 छोटे/मोठे बॅनर्स, 41 शेड्स, 1 गोडाऊन, 6 टप-या, अतिक्रमण केलेले 10 ओटे, दुकानदारांनी सोईनुसार अतिक्रमण करून केलेल्या पाय-या, 2 धोकादायक होर्डिंग्स यावर जेसीबी, गॅस कटर, पार, हातोडा इ. सामुग्रीच्या सहाय्याने निष्कासनाची धडक कारवाई करण्यात केली.

सदर कारवाई यापुढेही सातत्याने सुरु राहील अशी माहिती फ प्रभागाच्या सहा. आयुक्त हेमा मुंबरकर व ग प्रभागाचे सहा. आयुक्त भारत पवार यांनी दिली आहे.

# पडघा ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंच पदी अलका मोरे



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : राजकीय दृष्ट्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या व वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंच पदी अलका मोरे यांची निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

मावळते सरपंच रविंद्र विशे यांचा राजीनामा गटविकास अधिकारी भिंवडी यांनी मंजूर केल्याने हे सरपंच पद रीक्त झाले होते. त्यानुसार ग्रामपंचायतीच्या कामकाजावर परिणाम होऊ नये म्हणुन ग्रामपंचायतीच्या उपसरपंच अलका गुरूनाथ मोरे यांची गटविकास अधिकारी भिंवडी यांच्या आदेशानुसार पडघा ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंच पदी निवड करण्यात आली. त्यांची निवड होताच त्यांच्या समर्थकांनी फटक्यांची आतषबाजी केली. यावेळी मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख, तथा माजी सरपंच व विद्यमान सदस्य शैलेश बिडवी यांच्या हस्ते प्रभारी सरपंच पदाचा पदभार अलका मोरे यांच्याकडे सोमवारी ग्रामपंचायत कार्यालयात शाल, पुष्पगुच्छ देऊन सुपूर्द करण्यात आला. यावेळी मावळते सरपंच रविंद्र विशे, माजी सरपंच व विद्यमान सदस्या नयना जाधव, सायली पाटील, ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे मनसे उपतालुकाध्यक्ष गुरूनाथ मते, विभागप्रमुख सदानंद गोरले, प्रताप विशे, उद्योजक सुभाष कथोरे, विकास थेटे, माजी उपसरपंच गुरुनाथ मोरे, दिपक मोरे,संदीप गायकवाड, नरेश गायकवाड, संतोष घोलप ग्रामपंचायत कर्मचारी राकेश तेलवणे, श्रीकांत पांडव, दिपक कांबळे, अनुष्का आळशी जयवंत लोणे, नागरीक उपस्थित होते.

# भाल परिसरात विद्युत पोल पडल्याने चार दिवस गाव अंधारात



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण तालुक्यातील भाल तुकारामवाडी परिसरात चार पाच विद्युत पोल पडल्याने ऐन दिवाळीत गाव अंधारात होता. त्यामुळे याबाबत ग्रामस्थांनी शिवसेना ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख समीर म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली विजय मंडळ कार्यालयावर धडक दिली असता तात्काळ संबंधित अधिकारी यांनी सदरचे विद्युत पोल उभारण्याचे आदेश देत वीज पुरवठा सुरळीत करण्याचे सांगितले. गेल्या काही दिवसांपासून पेण तालुक्यात परतीचा पाऊस वादळ वाऱ्यासह पडत असल्याने यामध्ये वढाव खारेपाट भागातील जीर्ण झालेले विद्युत पोल वादळ वाऱ्यासह पावसाने पडल्याने भाल तुकाराम वाडी गाव पूर्णतः ऐन दिवाळीत चार- पाच दिवस अंधारात होते याबाबत अनेकदा ग्रामस्थांनी संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्याकडे याबाबत विचारणा केले असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली .अखेर ग्रामस्थांनी शिवसेना तालुकाप्रमुख समीर म्हात्रे यांच्याकडे तक्रार केली असता त्यांनी तात्काळ विज मंडळ कार्यालय येथे ग्रामस्थांसह जाऊन याबाबतची विचारणा केली व सदर परिसरातील पडलेले विद्युत पोल तात्काळ उभे करून लाईट सुरू करावी अशी मागणी केली असता यावर विज मंडळाचे कार्यकारी अभियंता उमेश चव्हाण यांनी संबंधित कर्मचारी यांच्याशी संपर्क साधून विद्युत पोल उभे करण्याचे सांगत तात्काळ लाईट सुरु करण्याचे आदेश दिल्याने उपस्थित ग्रामस्थांनी यावेळी समीर म्हात्रे यांचे आभार मानले.

# स्वागत मित्र मंडळ आणि राया संस्थेच्या वतीने पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण मधील बेतूरकर पाडा येथील स्वागत मित्र मंडळ आणि राया शैक्षणिक व सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने बीड जिल्ह्यातील गेवराई तालुका गुळज या गावी तसेच अहिल्या नगर जिल्ह्यातील, शेवगाव तालुक्यातील मुंगी या गावातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीकरता मुंबई मुंबई, अँटी करप्शन येथे कार्यरत असलेले रामेश्वर खरुळे यांच्या पुढाकाराने, निलेश जाधव, मुकुंद कुटे, अजित मस्के यांच्यासह दैनंदिन गरजेचे धान्य आदींच्ची मदत करण्यात आली.

या कार्यक्रमाकरिता कल्पना कुलकर्णी, गौरी पाटील, कैलास साळुंखे, प्रशांत वरगुडे, प्रसाद पवार व राजेंद्र कांबळे यांनीही मदती करिता पुढाकार घेतला. नवीन मनीषा नगर मधील रहिवाशी तसेच पोलीस खात्यातील अधिकारी अंमलदार आणि इतर शाळेतील शिक्षक वर्ग मित्र परिवार यांनी दिलेल्या योगदानातून 150 बळीराजाला गहू, तांदूळ, तेल, मीठ, मिरची, हळद, रवा, पोहे, साखर, तूर डाळ, चणाडाळ, चहा पावडर, कपड्याचे व अंघोळीचे साबण टूथपेस्ट इत्यादी साहित्य शेतकरी व पूरग्रस्त कुटुंबांना रात्रभर प्रवास करून सकाळी पोहच केले. हा कार्यक्रम पार पाडण्याकरिता युनिक ब्लड मोटिव्हेटर्स फाउंडेशन मुंबई, ओम शिव साई प्रतिष्ठान सायन यांच्यासह रहिवाशांनी मोलाचे योगदान दिले.

हे किट भरण्यापासून ते पोचविण्यापर्यंत रामेश्वर खरुळे, तेजस खरुळे, सार्थक खरुळे, गौरव शिंगणे, सोहम सांगळे, कुणाल जाधव, केतन बाविस्कर, मिहिर जाधव, ओम नाईक, बबन गिते व साहिल गीते यांचे सहकार्य लाभले. तसेच हा माल वाहून नेण्याकरिता प्रवीण बागडे व चालक राहुल साळवी यांची मदत मिळाली.

# सशस्त्र सैन्यदलात प्रशिक्षणाची संधी

## अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुर्वणसंधी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता


**ठाणे** : भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Service Selection Board (SSB) या परिक्षेची पूर्व तयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी दि.03 नोव्हेंबर 2025 ते दि.12 नोव्हेंबर 2025 या कालावधीत SSB कोर्स क्रमांक 63 आयोजित करण्यात येत आहे. कोर्स कालावधीत प्रशिक्षनार्थीना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

तरी ठाणे व पालघर जिल्ह्यातील इच्छुक उमेद्वारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय ठाणे येथे दि.29 ऑक्टोबर 2025 रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईटवर सर्च करुन त्यामधील SSB-63 कोर्ससाठी (किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेवून व ते पूर्ण भरून सोबत घेऊन यावे.

या SSB वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र कोर्सला येताना सोबत घेवून यावेत:-

(अ) कंबाइंड डिफेन्स सर्व्हीसेस एक्झामिनेशन (CDSE-UPSC) अथवा नॅशनल डिफेंस ॲकेडमी एक्झामिनेशन (NDA-UPSC) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हीसेस सिलेक्शान बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. (ब) एनसीसी 'C' सर्टिफीकेट 'A' किंवा 'B' ग्रेड मध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबी साठी शीफारस केलेली असावी. (क) टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. (ड) विद्यापीठ प्रवेश प्रणाली (University Entry Scheme) साठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा SSB साठी शीफारस केलेल्या यादीत नांव असावे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ई-मेल आय डी: training-pctcnashik@gmail.com व दूरध्वनी क्र.0253-2451032 व भ्रमणध्वनी क्र.9156073306 असून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा] असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ठाणे/पालघर मेजर प्रांजल जाधव (नि.) यांनी केले आहे.



मुंबईतील कबुतरखाने बंद झाल्यामुळे जैन समाजामध्ये प्रचंड नाराजी आहे. मुनी निलेश चंद्र विजय यांनी यापूर्वी "गरज पडल्यास शस्त्रे उचलू" असा इशारा दिला होता, ज्यामुळे वाद निर्माण झाला होता. मात्र, आता त्यांनी शांततामय मार्गाने 'आमरण उपोषणा'चे अस्त्र हाती घेतले आहे. १ नोव्हेंबरची परवानगी नाकारल्यानंतर आता ३ नोव्हेंबरपासून हे आंदोलन सुरू करण्याचा त्यांचा निर्धार कायम आहे. या आंदोलनामुळे मुंबईतील राजकीय आणि सामाजिक वातावरण पुन्हा एकदा तापण्याची शक्यता आहे







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024